महावितरण (TM)

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१

दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

---

**क्र. मु.अ.(वा)/लेखा/ग्रा.पं.दिवाबत्ती/५५/२०१३-१४/** No 21643 **दिनांक :** 1 AUG 2013

**परिपत्रक क्र.** ९८९

विषय :- ग्रामपंचायतीना रस्त्यावरील विजेच्या दिव्यांच्या वीज बिलांची रक्कम देण्यासाठी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी अनुदानापोटी मंजुर केलेली रक्कम रु. १२५,१५,८८,०००/- (रुपये एकशे पंचवीस कोटी पंधरा लाख अठ्याऐंशी हजार फक्त)

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्र. बीजीटी-२६०३/प्र.१९९२/पंरा-४ / दि.२२.०९.२००३.

२) वित्त विभाग परिपत्रक क्र. अंदाज/२०१३/प्र.क्र.८५/२०१३/अर्थसं.३ दि.२५.०४.२०१३.

३) शासन निर्णय क्र. अर्थसं.२०१३/प्र.क्र.-३३/वित्त-२ दि.१५.०६.२०१३

---

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यावरील दिवाबत्तीची विज देयके भागविण्यासाठी शासन ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देते. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात सदर अनुदानासाठी रक्कम रुपये १५६,४४,८५,०००/- (रुपये एकशे छापन्न कोटी चौरेचाळीस लाख पंच्याऐंशी हजार फक्त) इतकी तरतुद शासकीय अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे, त्यापैकी रक्कम रुपये १२५,१५,८८,०००/- (रुपये एकशे पंचवीस कोटी पंधरा लाख अठ्याऐंशी हजार फक्त) वरील संदर्भिय शासन निर्णयासोबत जोडलेल्या जिल्हा निहाय विवरण पत्रात दर्शविल्याप्रमाणे शासनाकडून, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितला रोखीत प्राप्त झाले आहेत.

शासन निर्णयासोबत जोडलेल्या जिल्हा निहाय विवरण पत्रातील रक्कमेचे, सबंधीत जिल्हयातील ग्रामपंचायतीच्या नावाने थकबाकीच्या प्रमाणात वर्ग करण्याबाबत संबंधितांनी जरुर ती कार्यवाही करावी.

थकबाकी पोटी समायोजित करण्यात आलेल्या रक्कमेचे (सन २०३१-१४) ग्रामपंचायत निहाय विवरण पत्राची एक प्रत संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच विभागीय आयुक्त व उपसचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांच्यासह या कार्यालयास त्वरित पाठवावी.

**सोबत :** वरीलप्रमाणे

डॉ- पि. मो. कुंटे

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत सविनय सादर :-**

संचालक (वित्त), म.रा.वि.वि.कं. मर्यादित, प्रकाशगड, बांद्रा (पू), मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना :-**

१. सर्व मुख्य अभियंते, म.रा.वि.वि.कं. मर्यादित, संवसु परिमंडळ कार्यालये, माहिती व उचित कार्यवाहसाठी

२. मुख्य महाव्यवस्थापक (निगम वित्त), म.रा.वि.वि.कं. मर्यादित, मुंबई.

**प्रत रवाना :**

१. सर्व अधिक्षक अभियंते, संवसु मंडळ कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित

२. महाव्यवस्थापक (अर्थोपाय विभाग), ३ रा मजला, हॉगकाँग इमारत, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

३. सर्व कार्यकारी अभियंते, संवसु विभागीय कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित

४. सर्व उपकार्यकारी अभियंते / सहाय्यक अभियंते, संवसु उपविभागीय कार्यालये.

---- उचित कार्यवाहीसाठी.

E:\vaze\Accts\circular streetlight 30.7.doc

**अर्थसंकल्पीय अनुदान सन २०१३-२०१४**
**मागणी क्र. एल -५ लेखाशिर्ष ३६०४** - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमादेणे.२००इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकितरकमादेणे- (०१)(०३)रस्त्यावरील विजेच्या दिव्यांची वीज बिलांची रक्कम देण्यासाठी ग्राम पंचायतीना १०० % अनुदान (३६०४०३२५) (दत्तमत)

**महाराष्ट्र शासन**

ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्र. अर्थसं २०१३/प्र.क्र.-३३ /वित्त-२
मंत्रालय, मुंबई -- ४०००३२
दिनांक -१५/६/२०१३

संदर्भ वाचा :- १) शासन निर्णय . ग्राम विकास विभाग क्र. व्हीपीएम २०८५/सीआर १९४०/२२ दि . ३०.१.९०
२)शासन निर्णय क्र. बीजीटी-२६०३/प्र.१९९२/पंरा-४/दि.२२सप्टेंबर,२००३
३)वित्त विभाग परिपत्रक क्र.अंदाज २०१३/प्र.क्र८५/२०१३/अर्थसं.३ दिनांक २५एप्रिल, २०१३

प्रस्तावना :-

ग्रामपंचायतींच्या हद्दीतील रस्त्यांवरील दिवाबत्तीची वीज देयके भागविण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देण्यात येते. यासाठी सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात रुपये १५६.४४.८५,०००/- (अक्षरी रुपये एकशे छप्पन कोटी चव्वेचाळीस लक्ष पंच्याऐंशी हजार फक्त ) इतक्या रकमेची अर्थसंकल्पीय तरतूद केलेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची दिवाबत्तीची देयके त्वरित भागविण्यासाठी प्रशासकीय विभागांनी शासकीय अनुदानातून परस्पर सदर रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे भरणा करावी असा निर्णय शासनाने सन २००३ या वर्षी घेतलेला आहे.

**शासन निर्णय** :-

सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात सदर अनुदानासाठी रक्कम **रु.१५६,४४.८५,०००/- (अक्षरी रुपये एकशे छप्पन कोटी चव्वेचाळीस लक्ष पंच्याऐंशी हजार फक्त** ) इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यांत आली आहे.

२. या शासन निर्णयान्वये ग्रामपंचायतींच्या हद्दीतील रस्त्यांवरील विजेच्या दिव्यांची वीज देयके अदा करण्यासाठी मंजूर तरतूदीच्या ८०% च्या मर्यादेत **रु.१२५,१५,८८०००/- (अक्षरी रुपये एकशे पंचवीस कोटी पंधरा लक्ष अठठयाऐंशी हजार फक्त**) इतकी तरतूद सोबतच्या विवरणपत्रात जिल्हानिहाय दर्शविलेल्या विगतवारीप्रमाणे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित. मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून ती आता या शासन निर्णयाद्वारे कार्यासन अधिकारी. रोखशाखा. ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय. यांचे अधिनस्त ठेवण्यात येत आहे. सदरचा निधी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथून आहरित करुन वितरित करण्यासाठी त्यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी उपरोक्त मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाच्या धनादेश महाराष्ट्र राज्य. विद्युत वितरण कंपनी मर्यादित. मुंबई यांच्या नावाने अधिदान व लेखा कार्यालय. मुंबई येथून काढावयाचा आहे. श्री. वि.म. राउत. कार्यासन अधिकारी, रोखशाखा यांच्या सहीने तयार केलेले व श्री. मो. का. भोये, उप सचिव (रोखशाखा ). ग्राम विकास व जलसंधारण विभाग. मंत्रालय. मुंबई यांनी प्रतिस्वाक्षरीत केलेले देयक अधिदान व लेखा कार्यालय. मुंबई यांचेकडे सादर करण्यात यावे.

४ या करीता **रुपये १२५,१५,८८०००/-(अक्षरी रुपये एकशे पंचवीस कोटी पंधरा लक्ष अठठयाऐंशी हजार फक्त**) इतक्या अनुदानास मंजूरी देण्यात येत आहे. इतके अनुदान खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे.

अ) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांना दिलेल्या धनादेशाची रक्कम त्यांनी या शासन निर्णयासोबतच्या विवरण पत्रातील रकाना क्र. ३ मधील रक्कम त्या त्या जिल्हा परिषदांच्या अखत्यारीत असलेल्या ग्रामपंचायतीच्या रस्त्यावरील दिवाबत्तीच्या वीज देयकाच्या थकबाकीस अधीन राहून समायोजित करावी व तसा अहवाल शासनास सादर करावा .

ब) समायोजित केलेल्या रक्कमेबाबतचे स्वतंत्र विवरणपत्र महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांनी ठेवणे आवश्यक असून त्याची एक प्रत त्यांनी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना पाठवावयाची आहे. तसेच त्याची एक प्रत शासनालाही पाठवावयाची आहे.

क) वरील अटींची पूर्तता होत आहे याची खात्री करुन घेण्यासाठी महालेखापाल, महाराष्ट्र -१ , मुंबई आणि महालेखापाल , महाराष्ट्र -२, नागपूर यांना लेखापरिक्षणाकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांची पुस्तके व लेखा पाहणीचा अधिकार राहील. महालेखापाल यांना त्यांचे काम पार पाडण्याकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांनी सर्वतोपरी सहकार्य दिले पाहिजे.

ड) खर्चाचा मेळ घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांनी खर्चाची विवरणपत्रे विभागीय आयुक्तांना पाठवून त्याची एक प्रत शासनास पाठवावी.

विभागीय आयुक्तांनी शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग क्र. आरसीएन१०८९/प्र.क्र.३०२७/२८, दि. ५.९.९० मधील सूचनेप्रमाणे या अनुदानाच्या खर्चाचा महालेखापालांकडे नोंदलेल्या खर्चाबरोबर मेळ घालावा व अहवाल शासनाकडे पाठवावा.

५. उपरोक्त निधीबाबत नियंत्रक अधिकारी म्हणून उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग हे राहतील .

६. या शासन निर्णयाव्दारे मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाएवढा खर्च मागणी क्र.एल-५, "३६०४" स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे, २०० इतर संकीर्ण नुकसानभरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१)(०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्यांची वीज बिलाची रक्कम देण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देणे (३६०४०३२५) (दत्तमत)-५० -इतर खर्च या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो उपरोक्त लेखाशिर्षाखाली सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षासाठी असलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

८. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक-३१२/२०१३/व्यय-१५ अन्वयेनिर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( प्रि.शं. कांबळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई -४०० ००१ वर नमूद केल्याप्रमाणे तीन प्रतीत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.(३ प्रती )

२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई ४०० ००१

३) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई ४०० ००१

४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर .

५) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर
६) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,प्रकाशगड,वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ००५१ (५ प्रती)
७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित प्रकाशगड अनंत काणेकर मार्ग, वांद्रे ( पूर्व ) मुंबई ४०० ०५१.
८) मुख्य अभियंता (वाणिज्य), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड (वाणिज्य विभाग) ५ वा मजला, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१ (५ प्रती)
९).अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य (अराप/रालेवि-१), मुंबई.
१०) निवासी लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई.
११) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा , कोकण भवन , वाशी , नवी मुंबई
१२) उप लेखा परिक्षक , नवी मुंबई , वाशी /पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर
१३) मुख्य अभियंता, विद्युत विभाग, महाराष्ट्र शासन, प्रशासकीय इमारत, ५९ रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई ४०० ०७१
१४) अवर सचिव (उर्जा -३) उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१५) विभागीय आयुक्त (सर्व)
१६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१७) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
१८) सर्व जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)
१९) कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारणविभाग (वित्त -१, वित्त- ७, वित्त -८)
२०) कक्ष अधिकारी (रोखशाखा) ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई.३२.
२१) वित्त विभाग (अर्थसंकल्प १७ /व्यय१५)मंत्रालय, मुंबई.३२.
२२) निवडनस्ती ,वित्त-२ ग्राम विकास व जलसंधारण विभाग.

विवरणपत्र

शासन निर्णय क्र. , अर्थसं.२०१३/प्र.क्र.३३/वित्त-२, दिनांक १५/६/२०१३ चे विवरणपत्र

मागणी क्र. एल -५ लेखाशिर्ष ३६०४ - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २००, इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१) (०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्याची वीज बिलांची रक्कम देण्यासाठी ग्राम पंचायतीना १००%अनुदान (३६०४०३२५) (दत्तमत) -५० इतर खर्च.

(रुपये /हजारात)

| अ. क्र. | जिल्हा परिषद | या शासन निर्णयान्वये वितरित करण्यांत येत असलेले अनुदान | |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ठाणे | ३४००५ | (रुपये तीन कोटी चाळीस लक्ष पाच हजार फक्त ) |
| २ | रायगड | ३६०१० | (रुपये तीन कोटी साठ लक्ष दहा हजार फक्त ) |
| ३ | रत्नागिरी | १८५१३ | (रुपये एक कोटी पंच्याऐशी लक्ष तेरा हजार फक्त ) |
| ४ | सिंधुदूर्ग | १२३४६ | (रुपये एक कोटी तेवीस लक्ष शेहचाळीस हजार फक्त ) |
| ५ | नासिक | ७०२८५ | (रुपये सात कोटी दोन लक्ष पंच्याऐशी हजार फक्त ) |
| ६ | धुळे | २३८४० | (रुपये दोन कोटी अडतीस लक्ष चाळीस हजार फक्त ) |
| ७ | नंदूरबार | ४०६५६ | (रुपये चार कोटी सहा लक्ष छप्पन हजार फक्त ) |
| ८ | जळगांव | ४४१६७ | (रुपये चार कोटी एकेचाळीस लक्ष सदूसष्ट हजार फक्त ) |
| ९ | अहमदनगर | ३५४८५ | (रुपये तीन कोटी चौपन्न लक्ष पंच्याऐंशी हजार फक्त ) |
| १० | पुणे | ४१५९५ | (रुपये चार कोटी पंधरा लक्ष पंच्याण्णव हजार फक्त ) |
| ११ | सातारा | ६०८६८ | (रुपये सहा कोटी आठ लक्ष अडूसष्ठ हजार फक्त ) |
| १२ | सांगली | ३१३२९ | (रुपये तीन कोटी तेरा लक्ष एकोणतीस हजार फक्त ) |
| १३ | सोलापूर | ४३२८६ | रुपये चार कोटी बत्तीस लक्ष शहाऐंशी हजार फक्त ) |
| १४ | कोल्हापूर | १८९२० | (रुपये एक कोटी एकोणनव्वद लक्ष वीस हजार फक्त ) |
| १५ | औरंगाबाद | ४३०२० | (रुपये चार कोटी तीस लक्ष वीस हजार फक्त ) |
| १६ | जालना | २५७१० | (रुपये दोन कोटी सत्तावन्न लक्ष दहा हजार फक्त ) |
| १७ | परभणी | ५५४३८ | (रुपये पाच कोटी चौप्पन लक्ष अडतीस हजार फक्त ) |
| १८ | हिंगोली | ३१९१० | (रुपये तीन कोटी एकोणीस लक्ष दहा हजार फक्त ) |
| १९ | बीड | ५४०७२ | (रुपये पाच कोटी चाळीस लक्ष बहात्तर हजार फक्त ) |
| २० | नांदेड | ७२५५२ | (रुपये सात कोटी पंचवीस लक्ष बावण्ण हजार फक्त ) |
| २१ | उस्मानाबाद | ४०१३९ | (रुपये चार कोटी एक लक्ष एकोणचाळीस हजार फक्त ) |
| २२ | लातूर | ५४९५३ | (रुपये पाच कोटी एकोणपन्नास लक्ष त्रेप्पन हजार फक्त ) |
| २३ | बुलढाणा | ४०१२८ | (रुपये चार कोटी एक लक्ष अठठावीस हजार फक्त ) |
| २४ | अकोला | २९०४० | (रुपये दोन कोटी नव्वद लक्ष चाळीस हजार फक्त ) |
| २५ | वाशिम | २६४०० | (रुपये दोन कोटी चौसष्ट लक्ष फक्त ) |
| २६ | अमरावती | ३२३५२ | (रुपये तीन कोटी तेवीस लक्ष बावन्न हजार फक्त ) |
| २७ | यवतमाळ | ६०१८१ | (रुपये सहा कोटी एक लक्ष एक्याऐशी हजार फक्त ) |
| २८ | वर्धा | २९४१५ | (रुपये दोन कोटी चौ-याण्णव लक्ष पंधरा हजार फक्त ) |
| २९ | नागपूर | ४१८१४ | (रुपये चार कोटी अठरा लक्ष चौदा हजार फक्त ) |
| ३० | भंडारा | १७६७३ | (रुपये एक कोटी शहात्तर लक्ष त्र्याहत्तर हजार फक्त ) |
| ३१ | गोंदिया | १०४४९ | (रुपये एक कोटी चार लक्ष एकोणपन्नास हजार फक्त ) |
| ३२ | चंद्रपूर | ३४५६३ | (रुपये तीन कोटी पंचेचाळीस लक्ष त्रेसष्ठ हजार फक्त ) |
| ३३ | गडचिरोली | ४०४७४ | (रुपये चार कोटी चार लक्ष चौ-याहत्तर हजार फक्त ) |
| | **एकूण** | **१२५१५८८** | **(रुपये एकशे पंचवीस कोटी पंधरा लक्ष अठठयाऐंशी हजार फक्त )** |

( प्रि.शं. कांबळे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.